**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

# सुचना

मुस्लिम बांधवांचा रमजान सन दि.19.02.2026 पासून सुरु होत असून संध्याकाळच्या वेळेस त्यांचा उपवास सोडल्यानंतर अतिरीक्त कचरा निर्माण होतो. तसेच सांयकाळच्या वेळेस एम/पूर्व विभागातील परिसरात व मस्जीदच्या बाजूला निर्माण होणारा अतिरिक्त कचरा उचलून साफसफाई करण्याकरीता अतिरिक्त व्यवस्था उपलब्ध नसल्याने रमजानच्या महिन्यामध्ये दि.19.02.2026 ते दि.21.03.2026 या 31 दिवसांच्या कालावधीत साफसफाईचे काम करुन घेण्याकरीता अतिरिक्त एनजीओ कामगार नियुक्त करुन साफसफाई ठेवणे गरजेचे आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त कामाकरीता **एम/पूर्व विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था (महीला बचत गट व विविध मंडळ वगळून ) या** संस्थाकडून अर्ज दि.13.02.2026 ते 16.02.2026 रोजी दुपारी 1 वाजेपर्यंत अर्ज सादर करुन चलन प्राप्त करावे. तरी इच्छुक असलेल्या संस्थानी या कार्यालयातुन एकूण रु.363/- + 18% GST रोख स्वरुपात घकव्य कार्यालयात किंवा राष्ट्रीयकृत बँकेचा डी.डी. 'बृहन्मुंबई महानगरपालिका' (Brihanmumbai municipal corporation ) या नावाने ना परतावा नागरी सुविधा केंद्र (CFC) येथे जमा केल्यानंतर या कार्यालयातून अर्ज देण्यात येतील. चलन देण्याची अंतिम तारीख दि.16.02.2026 रोजी दुपारी 1.00 वाजेपर्यंत असेल. त्याच्यासोबत एम/पूर्व विभागातील स्थानिक संस्था असलेल्याचा पुरावा सोबत जोडावा. तसेच सादर केलेल्या अर्जाची सोडतपध्दतीद्वारे नियुक्ती करण्यात येईल.

1) **एम/पूर्व विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणा-या इच्छुक स्थानिक नोंदणीकृत मजुर सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, औदयोगिक सेवा सहकारी संस्था, अशासकीय संस्था (महीला बचत गट व विविध मंडळ वगळून ) या संस्था सदर कामासाठी अर्ज करु शकता.**
2) **सोडतीमध्ये यशस्वी झालेल्या संस्थांना त्यांचे मुळ कागदपत्र तपासणी करीता कार्यालयात बोलविल्यास सदर कागदपत्रे घेवून या कार्यालयात उपस्थित राहणे संस्थेच्या पदाधिकारी यांना बंधनकारक असेल.**
3) **विहीत वेळेत कागदपत्रांची पुर्तता न केल्यास सदर संस्थांना अपात्र करुन अनुक्रमे प्रतिक्षा यादीमधील संस्थेस काम देण्यात येईल.**
4) **तसेच ज्या संस्थांनी कामगारांचा PF & ESIC भरलेला नसेल अशा संस्थेने सदर कामाकरीता अर्ज सादर करु नये, अर्ज सादर केल्याचे निदर्शनास आल्यास सदर संस्थेस अपात्र करण्यात येईल.**

| सही/- | सही/- |
|---|---|
| **समुप (घकव्य) एम/पूर्व** | **सहाय्यक अभियंता (घकव्य) एम/पूर्व** |